# नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ११/१२/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **डिसेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

**३.** जुईपाडा स्मशानभुमीची सुधारणा करणे.

**४.** मोरबे धरण प्रकल्प येथे धरणाच्या खालील बाजूस रस्ता बनविणे.

**५.** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे वातानुकूलीत यंत्रणा लावणे.

**६.** नमुंमपाच्या विविध विभागांसाठी कोरे स्टॅंडर्ड पेपर्स, फाईल कव्हर्स, लखोटे इत्यादी साहित्य खरेदी करणे.

**७.** पामबीच येथील से. ५० ते मुख्यालयापर्यत सर्व्हिस रस्त्याचे डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**८ ते १०. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(८) नमुंमपा हद्दीतील सिडको वसाहतीमध्ये ज्या प्रमाणे मलनि:सारण वाहिन्या व पेवर ब्लॉक ची कामे केली जातात तशाच प्रकारे गावठाण विस्तार योजनेतील सोसायटयांमध्ये कामे करणे. (९) प्र. क्र.६५ जुईनगर येथील कै. जनार्दन वे पाटील विद्यालय शाळा क्र. १७च्या भोवती संरक्षण भिंत बांधणे. (१०) प्र. क्र.६५ जुईनगर सेक्टर २२ येथील रेल्वे वसाहतीच्या मागील रस्ता नव्याने बनविणे.

**११ व १२. श्री. रामआशिष राजबली यादव, यांजकडून :-**

(११) प्र. क्र. ०६, यादवनगर देवीधाम नगर येथे रोडचे डांबरीकरण व दोन्ही बाजूनी गटार बनविणे. (१२) प्र. क्र. ०६, देवीधाम नगर, यादव नगर ते मोठे नालेपर्यंत पाईप लाईन जवळ गटार बनविणे.

**१३ व १४. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

(१३) प्र. क्र. २० अंतर्गत शाळा क्र. ४५, सम्राटनगर येथे विदयार्थ्यांची पटसंख्या ५५० असून तेथे कामगारांची संख्या ३ आहे तरी हया पटसंख्येप्रमाणे कामगारांची संख्या ६ हवी होती. म्हणून लवकरात लवकर ३ कामगारांची संख्या वाढविणे. (१४) प्र. क्र. २० अंतर्गत शाळा क्र. ४४, तळवली गांव येथे विदयार्थ्यांची पटसंख्या ५३१ असून तेथे कामगारांची संख्या ४ आहे तरी हया पटसंख्येप्रमाणे कामगारांची संख्या ६ हवी होती. म्हणून लवकरात लवकर २ कामगारांची संख्या वाढविणे.

**१५ व १६. श्री. प्रभाकर गोमा भाईर, यांजकडून :-**

(१५) प्र. क्र. ४५, जुहूगांव गावदेवी मंदीराच्या बाजुचा हिंमबिदू सोसायटीला लागुन असलेला यापुर्वी हा भुखंड कुबेर बिल्डर डेव्हलपर्स यांना दिलेला आणि नंतर सिडकोने परत आपल्या ताब्यात घेतलेला भुखंड नवी मुंबई महानगरपालिकाकडे वर्ग करुन घेण्यात यावा व येथील जुहूगांव ग्रामस्थांची अडचण लक्षात घेऊन त्यांच्या मागणी नुसार सार्वजनिक उपक्रम राबविण्यासाठी जुहूगांव ग्रामस्थाना देणे. (१६) प्र. क्र. ४५, जुहूगांव येथील पाण्याच्या टाकीची संरक्षण भिंत बांधणे.

**१७ ते १९. श्री. मनोज गोपिनाथ हळदणकर, यांजकडून :-**

(१७) प्र. क्र. ११, ऐरोलीतील मुख्य नाला बंदिस्त करुन त्यावर पार्किंग व व्यापारी गाळे निर्माण करणे. (१८) प्र. क्र. ११, ऐरोली **येथील** माता बाल रुग्णालयाचे काम करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची दुरावस्था झाली असल्याने सदर उद्यानाचे सुशोभिकरण करणे. (१९) प्र. क्र. ११, ऐरोली येथील सामाजिक उपक्रमाकरिता राखीव भूखंड हस्तांतरित झाले असल्यास त्यावर व्यायामशाळा व महिला सक्षमीकरण केंद्र उभारणे.

**२० ते २२. श्री. संदिप बाळकृष्ण सुतार, यांजकडून :-**

(२०) प्र. क्र. ७९, दारावे येथील सेक्टर २१ मधील श्री. शंकराचार्य उद्यानाचे सुशोभिकरण करणे. (२१) प्र. क्र. ७९, दारावे गावातील सेक्टर -२३ मधील तलावाजवळील उद्यानाचे सुशोभिकरण करणे. (२२) **प्र.** क्र. ७९, सेक्टर -२३ येथील दारावे गावठाण विस्तारीत सर्व फुटपाथची दुरुस्ती करणे.

**२३. श्री. विनित मोतीराम पालकर, यांजकडून:-**

नमुंमपाचे नवीन मुख्यालय इमारत देशातील एक आकर्षक व आयकॉन ठरावी अशा रितीने से. १५अे, सी.बी.डी. बेलापूर येथे उभारली जात आहे. या इमारतीच्या आवारात महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनरुढ पुतळा स्थापीत केल्यास नवी मुंबईचे प्रशासकिय कामकाज करताना सर्वांनाच प्रेरणादायी ठरेल. तरी नवीन मुख्यालय इमारतीच्या आवारात छत्रपती शिवाजी महाराज यांचा इमारतीच्या भव्यतेला साजेसा सिंहासनरुढ पुतळा स्थापीत करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ११ डिसेंबर २०१३.**